**MHBI080000882012**

## नि.दि.दा.क्र.८८/२०१२ मधील निशाणी क्र.१२२ खालील आदेश

वादींनी सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र. ५ शेख जिलानी याच्या विरुध्द दावा अवसान (अबेट) झालेबाबतचा आदेश रद्द होऊन मिळण्यासाठी व त्याचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ५ हा ता. २७.१२.२०२१ रोजी मयत झाला आहे. प्रतिवादी क्र. ५ याचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादी क्र.५ चे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे सदरचा दावा त्याच्याविरुध्द अवसान झाला आहे. त्यामुळे सदरचा दावा अवसान झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे आवश्यक आहे. म्हणून त्याने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिला असून त्यांनी म्हटले आहे की, वादीचा अर्ज कायदेशीर नसून अर्जातील विलंबाचे कारण चुकीचे आहे. प्रतिवादी क्र. ५ चे विरुद्ध सदरचा दावा अवसान झाला आहे. त्यामुळे वादीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

| | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय ? | ... | होय. |
| २. | आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

### कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबत**

४. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री. गजमल व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. इनामदार यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. प्रतिवादी क्र.५ हा ता. २७.१२.२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. प्रतिवादी क्र.५ हा मयत झाल्यानंतर ९० दिवसाच्या आत वादीने त्याचे वारस अभिलेखावर न घेतल्यामुळे त्याच्याविरुध्द दावा अवसान झाला आहे. परंतु दोन्ही पक्षकारामधील वादाचे कायमचे निराकरण करण्यासाठी व न्यायाचे हितार्थ मयत प्रतिवादी क्र.५ याचे विरुध्द दावा अवसान झाल्याबाबतचा आदेश रद्द करणे व वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ बाबत**

५. मी वर नमुद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

सदरचा निशाणी क्र.१२२ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by SOPAN D GHANWAT
Date: 2023.06.06 15:55:25 +0530

दिनांक – ०६/०६/२०२३ (सो. द. घनवट)

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, माजलगाव.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव |
| सूर्यवंशी | | |
| कोर्टाचे नाव | – | दि.न्या.व.स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | ०६/०६/२०२३ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | ०६/०६/२०२३ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | ०६/०६/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | ०६/०६/२०२३ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – ०६/०६/२०२३

(ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय व. स्तर, माजलगाव